मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर तीन महिन्याकरिता बंद!


## 9 जानेवारीपासून बंद राहणार असल्याने अजून केवळ 12 दिवस भाविकांना दर्शन घेता येणार

**पिंपरी | प्रतिनीधी**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरात नवीन वर्षापासून भाविकांना जाता येणार नाही. जानेवारी महिन्यापासून पासून हे मंदिर दर्शनासाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे मंदिर ९ जानेवारीपासून बंद राहणार असल्याने अजून केवळ १२ दिवस भाविकांना दर्शन घेता येणार आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी मंदिर तीन महिने भाविकांसाठी बंद ठेवले जाणार असल्याची माहिती जाहीर केली. श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरातील सभामंडप व पायरी मार्गाच्या बांधकाम तसेच भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करण्याच्यादृष्टीने मंदिर ९ जानेवारी २०२६ पासून पुढील तीन महिन्यांसाठी महाशिवरात्रीचा कालावधी वगळून भाविकांना दर्शनाकरिता बंद करण्याचा निर्णय श्री क्षेत्र भिमाशंकर संस्थानने घेतला आहे.





राज्य शासनाने १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष विकास आराखड्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. या आराखड्यातील अत्यंत महत्त्वाच्या टप्प्याची अंमलबजावणी तसेच प्रत्यक्ष बांधकामाच्या काळातील सुरक्षितता लक्षात घेता २३ डिसेंबर रोजी जिल्हा प्रशासन, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान संस्थानचे विश्वस्त, स्थानिक दुकानदार व श्री. भीमाशंकर ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठकीत सर्वांच्या सहमतीने मंदीर ९ जानेवारीपासून पुढे तीन महिन्यासाठी तात्पुरते बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सन २०२७ मध्ये त्र्यंबकेश्वर, नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होणार असून, त्यापूर्वी प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभ २०२५ च्या अनुभवावरून कुंभमेळ्याच्या काळात नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या लाखो भाविकांकडून श्री क्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक पायाभूत सुविधा, सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था तसेच गर्दी नियंत्रणाची कामे वेळेत पूर्ण करणे हे प्रशासनाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. कामाचे स्वरूप व व्याप्ती लक्षात घेता भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक असल्याने मंदिर परिसर भाविकांसाठी तात्पुरता बंद करण्यात येणार आहे.

पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी म्हणाले, श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराचा विकास हा दीर्घकालीन सुरक्षितता, सुविधा आणि भाविकांच्या सोयीसाठी अत्यंत आवश्यक आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ही कामे नियोजनबद्ध व वेळेत पूर्ण करण्यासाठी मंदिर तात्पुरते बंद ठेवण्याचा निर्णय मंदीर संस्थानने घेतलेला आहे. भाविकांनी व स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासन यांना पूर्ण सहकार्य करावे.

### नित्य पूजा सुरु राहणार

» मंदिर दर्शनासाठी बंद असले तरी श्री भीमाशंकर यांची नित्य पूजाअर्चा, अभिषेक व धार्मिक विधी परंपरेनुसार व नियोजित वेळेत सुरू राहतील.

### थेट दर्शन बंद

» या कालावधीत भाविकांना मंदिर परिसरात प्रवेश अथवा प्रत्यक्ष दर्शन सेवा उपलब्ध राहणार नाही.

### प्रवेशावर निर्बंध

» बांधकाम यंत्रणा, अधिकृत अधिकारी कर्मचारी तसेच भीमाशंकर ग्रामस्थ वगळता कोणालाही श्री क्षेत्र भीमाशंकर परिसरात प्रवेश दिला जाणार नाही.

---

# प्रभाग 2 मध्ये दिग्गज आमनेसामने माजी नगरसेवक वसंत बोराटे तसेच माजी महापौर राहुल जाधव यांच्यात 'काटे की टक्कर'

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २ (जाधववाडी-कुदळवाडी) मधील राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. या प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) पक्षात प्रवेश केलेले व माजी नगरसेवक वसंत बोराटे तसेच माजी महापौर राहुल जाधव आणि यांच्यात थेट आणि चुरशीची लढत होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

वसंत बोराटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर प्रभागातील समीकरणे वेगाने बदलली आहेत. त्यांच्याकडे असलेला राजकीय अनुभव आणि कार्यकर्त्यांचे जाळे राहुल जाधव यांच्यासमोर मोठे आव्हान उभे करणार आहे. अश्विनी जाधव आणि रूपाली आल्हाट यांची साथ मिळाल्याने राष्ट्रवादीची ताकद या भागात अधिकच वाढली आहे. दुसरीकडे राहुल जाधव यांचाही जनसंपर्क दांडगा आहे.



या प्रभागात दोन्ही नेत्यांचा वैयक्तिक प्रभाव मोठा आहे. वसंत बोराटे आणि राहुल जाधव हे दोन्ही 'हेवीवेट' उमेदवार मानले जात असल्याने, ही निवडणूक केवळ प्रभागापुरती मर्यादित न राहता प्रतिष्ठेची बनली आहे. येथे विकासाच्या मुद्द्यावर आणि विद्यमान ताकदीवर भारतीय जनता पक्ष निवडणूक लढवत आहे. तर सत्तांतर आणि स्थानिक प्रश्नांवर भर देत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपला रोखण्याच्या तयारीत आहे. "दोन्ही नेत्यांनी यापूर्वी नगरसेवक म्हणून प्रभागाचे नेतृत्व केले आहे. दोघांचीही जनसामान्यांमध्ये पकड मजबूत असल्याने ही लढत अत्यंत अटीतटीची आणि ऐतिहासिक होईल यात शंका नाही."

जरी मुख्य लढत जाधव आणि बोराटे यांच्यात दिसत असली, तरी शिवसेना (ठाकरे गट), मनसे, काँग्रेस आणि समाजवादी पार्टीचे उमेदवार रिंगणात असल्याने मतांचे विभाजन कोणाच्या फायद्याचे ठरणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र, सध्याची परिस्थिती पाहता राहुल जाधव आणि वसंत बोराटे यांच्यातील थेट सामनाच या निवडणुकीचे मुख्य आकर्षण ठरणार आहे.

# टाळ-मृदुंगाच्या गजरात ‘मतदानाची दिंडी’

## विद्यार्थ्यांच्या सहभागातून नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून देणारा अभिनव उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

“मतदार राजा जागा हो-लोकशाहीचा धागा हो” अशा घोषणानी दुमदुमला परिसर सोबत टाळ-मृदुंगाचा गजर... लोकशाहीच्या मूल्यांचा जयघोष.. महापुरुषांची वेशभूषा साकारलेले विद्यार्थी... वारकरी परंपरेचा साज आणि भक्तिरसाने भारलेले वातावरण... अशी संस्कार, इतिहास आणि मतदानाचे महत्त्व यांचा संगम साधणारी ‘मतदानाची दिंडी’ पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने चिखली येथील संतपीठ परिसरात काढण्यात आली. या दिंडीच्या माध्यमातून प्रत्येक मतदाराने मतदान करणे हीच लोकशाहीची खरी ताकद असल्याचा संदेश देण्यात आला.




पिंपरी चिंचवड महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केली असून, या निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अधिपत्याखाली महापालिका हद्दीत स्वीप कार्यक्रमांतर्गत व्यापक मतदान जनजागृती मोहीम सुरू आहे.

या अंतर्गत महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, संतपीठ येथील प्राचार्य ज्ञानेश्वर गाडगे तसेच विद्यार्थ्यांचे पालक यांच्या प्रमुख उपस्थितीत महापालिकेच्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ शाळा येथे ‘दिंडी-मतदानासाठी’ हा अभिनव उपक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. वारकरी परंपरेचा साज चढवलेले विद्यार्थी, टाळ-मृदुंगाच्या गजरात, भक्तिरसाने भारलेले वातावरण, अशा उत्साहपूर्ण वातावरणात शाळेच्या परिसरातून निघालेली मतदानाची दिंडी जवळच असणाऱ्या गृहनिर्माण सोसायट्या, कॉलनी येथे गेली. त्याठिकाणी नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

हा उपक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका स्नेहल पगार, समन्वयिका मयुरी मुळुक यांच्यासह शाळेच्या शिक्षकांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचे पालक देखील या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

**लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान प्रक्रियेत सहभागी व्हा – तृप्ती सांडभोर**

यावेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी सांगितले की, लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी मतदान प्रक्रियेत प्रत्येक मतदाराचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना हे समजावून सांगावे की मतदानाचा दिवस ही केवळ सुट्टी नसून लोकशाहीच्या मजबुतीसाठीची जबाबदारी आहे. जसे तुम्ही खाऊसाठी आई-वडिलांकडे हट्ट धरता, तसाच हट्ट शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी मतदान करण्यासाठी करावा. अशा अभिनव आणि संस्कारक्षम उपक्रमांतून निश्चितच मतदानाचा टक्का वाढेल. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून कुटुंबांपर्यंत मतदानाचे महत्त्व पोहोचवणारा हा उपक्रम असून, पालकांपर्यंत प्रभावीपणे मतदानाचा संदेश पोहोचविण्यात येईल.

### कीर्तनातून सांगण्यात आले मतदानाचे महत्त्व..

» संतपीठ शाळेतील विद्यार्थिनी ह.भ.प. श्रुती रोडे हिने कीर्तनातून मतदानाचे लोकशाहीतील अनन्यसाधारण महत्त्व पटवून दिले. मतदानामुळे लोकशाही कशी बळकट होते आणि नागरिकांची जबाबदारी कशी अधिक दृढ होते, याचे प्रभावी प्रबोधन या सादरीकरणातून घडले. याच वेळी मतदान जनजागृतीपर पथनाट्यही सादर करण्यात आले.

### “हक्क आपल्या मतदानाचा” गीताचे सादरीकरण

» संतपीठ शाळेतील विद्यार्थ्यांनी “हक्क आपल्या मतदानाचा” हे प्रेरणादायी गीत सादर केले. हे गीत संतपीठ शाळेतील शिक्षकांनी रचले असून, विद्यार्थ्यांना गीत सादर करताना किबोर्ड वादक श्रुती तनपुरे, पखवाज वादक अविनाश भोगील आणि तबला वादक विवेक भालेराव यांनी साथ दिली. या गीताच्या सादरीकरणानंतर विद्यार्थ्यांना महापालिकेच्या वतीने मतदान जनजागृतीसाठी राबवण्यात येत असलेल्या ‘प्रिय आई-बाबा, पत्रास कारण की...’ या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना पत्रांचे वाटप करण्यात आले.

---

# डिजिटल माध्यमांतून मतदान जनजागृतीवर महापालिकेचा भर

## पिंपरी चिंचवड महापालिकेने मतदान जनजागृती चित्रफितीचे आयुक्तांच्या हस्ते अनावरण

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकशाहीची खरी ताकद ही नागरिकांच्या सक्रिय सहभागावर अवलंबून असते. मतदान हा केवळ हक्क नसून लोकशाहीप्रती आपले कर्तव्य आहे. प्रत्येक मत महत्त्वाचे असून त्याच्या माध्यमातून नागरिक आपल्या शहराच्या आणि प्रशासनाच्या भवितव्याची दिशा ठरवतात. त्यामुळे कोणताही नागरिक मतदानापासून वंचित राहू नये, लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने मतदानाचा हक्क बजावणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी केले.



राज्य निवडणूक आयोग व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात मतदान जनजागृतीसाठी स्वीप कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने तयार करण्यात आलेल्या मतदान जनजागृती चित्रफितीचे अनावरण आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमावेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांच्यासह उपायुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त श्रावण हर्डीकर म्हणाले, ‘स्वीप कार्यक्रमांतर्गत तयार करण्यात आलेली ही चित्रफित नागरिकांपर्यंत सोप्या, प्रभावी आणि भावनिक पातळीवर पोहोचणारे माध्यम ठरेल. युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच प्रथमच मतदान करणारे मतदार यांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांची आवश्यकता आहे. डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून अधिकाधिक नागरिकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचविण्यावर महापालिकेचा भर राहील. या चित्रफितीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होऊन मतदानाची टक्केवारी वाढण्यास मदत होईल,’ असा विश्वासही यावेळी त्यांनी व्यक्त केला.

# भाजपची फिल्डिंग तयार! 145 उमेदवारांची यादी फायनल

## प्रचाराचा नारळ फुटला पण तिकीट कोणाला? सोशल मीडियावर अनेक उमेदवारांचा दावा, तर फोन न गेलेल्यांची मुंबईकडे धाव.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीसाठी सर्वाधिक इच्छुक असलेल्या भाजपने महायुतीच्या जागा वगळता इतर १४० ते १४५ उमेदवारांची यादी निश्चित केली आहे. ही यादी आता जाहीर केल्यास मोठ्या प्रमाणावर बंडखोरी होण्याची शक्यता असल्याने भाजप पहिली यादी रविवारी तर नंतर बाकीच्या दोन याद्या जाहीर करण्याची शक्यता आहे. बंडखोरी टाळण्यासाठी तीन टप्प्यात यादी जाहीर करण्याची खेळी केली आहे.

भाजप २०१७ मध्ये निवडून आलेल्या ३० ते ४० माजी नगरसेवकांना नारळ देण्याची शक्यता आहे. त्यामुळे, हे इच्छुक दोन्ही राष्ट्रवादी तसेच कॉंग्रेसमध्ये प्रवेश करण्याची शक्यता आहे. त्यामुळे, त्यांची कोंडी करण्यासाठी ही खेळी केली जात असल्याचे सूत्रांनी सांगितले.




### युतीकडे लक्ष ?

» पुण्यात भाजप, रिपांई आणि शिवसेना युती म्हणून लढणार आहेत. भाजपकडे रिपाईने दहा जागांची मागणी केली असली तरी भाजपकडून त्यांना पाच ते सात जागा दिल्या जाणार आहेत. याशिवाय, शिवसेनेला १५ जागा देण्याची तयारी दर्शविली असून त्यात आणखी तीन जागांची वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, भाजपने तूर्तास शिवसेना सोबत असल्याचे गृहीत धरूनच आपल्या उमेदवारांची यादी निश्चित केली आहे.

शुक्रवारी संध्याकाळी ही चर्चा संपली असून पक्षाने उमेदवार निश्चित केले आहेत. हे पदाधिकारी पुण्यात परतले असून त्यांच्याकडून तिकिट निश्चित असलेल्या तसेच पहिल्या यादीतील उमेदवारांना प्रचार करण्याच्या सूचनाही दिल्याची चर्चा आहे.

आता शिवसेनेकडून ३५ जागांची मागणी करण्यात आलेली असून जागावाटपात सन्मानाने जागा न मिळाल्यास युतीतून बाहेर पडून मैत्रीपूर्ण लढण्याची तयारी शिवसेनेने केली आहे. त्यामुळे भाजपकडून युतीच्या चर्चेवर लक्ष ठेवण्यात आले असून युती न झाल्यास संबंधित प्रभागांसाठीही पक्षाने उमेदवारांची प्राथमिक यादी तयार केली असल्याचे सांगण्यात येत आहे.

यानुसार अनेकांनी सोशल मिडीयावर प्रचाराचा नारळ फोडला आहे. असे सुमारे ४२ ते ६२ उमेदवार असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे, फोन न गेलेल्या उमेदवारांची चलबिचल सुरू असून अनेक इच्छुकांनी दोन दिवस मुंबईत तळ ठोकत ओळखीच्या नेत्यांच्या माध्यमातून थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही भेटण्याचा प्रयत्न केला आहे.

याशिवाय, शिवसेनेला १५ जागा देण्याची तयारी दर्शविली असून त्यात आणखी तीन जागांची वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, भाजपने तूर्तास शिवसेना सोबत असल्याचे गृहीत धरूनच आपल्या उमेदवारांची यादी निश्चित केली आहे.

पुण्यात भाजप, रिपांई आणि शिवसेना युती म्हणून लढणार आहेत. भाजपकडे रिपाईने दहा जागांची मागणी केली असली तरी भाजपकडून त्यांना पाच ते सात जागा दिल्या जाणार आहेत. याशिवाय, शिवसेनेला १५ जागा देण्याची तयारी दर्शविली असून त्यात आणखी तीन जागांची वाढ होण्याची शक्यता आहे.

### उमेदवार यादी अंतीम

» पुण्यातील उमेदवारांबाबत चर्चा करण्यासाठी गेल्या दोन दिवसांपासून शहर पदाधिकारी मुंबईत तळ ठोकून होते. शुक्रवारी संध्याकाळी ही चर्चा संपली असून पक्षाने उमेदवार निश्चित केले आहेत. हे पदाधिकारी पुण्यात परतले असून त्यांच्याकडून तिकिट निश्चित असलेल्या तसेच पहिल्या यादीतील उमेदवारांना प्रचार करण्याच्या सूचनाही दिल्याची चर्चा आहे.

### शिवसेनेकडून ३५ जागांची मागणी

» आता शिवसेनेकडून ३५ जागांची मागणी करण्यात आलेली असून जागावाटपात सन्मानाने जागा न मिळाल्यास युतीतून बाहेर पडून मैत्रीपूर्ण लढण्याची तयारी शिवसेनेने केली आहे. त्यामुळे भाजपकडून युतीच्या चर्चेवर लक्ष ठेवण्यात आले असून युती न झाल्यास संबंधित प्रभागांसाठीही पक्षाने उमेदवारांची प्राथमिक यादी तयार केली असल्याचे सांगण्यात येत आहे.

# मद्यपी वाहनचालक, हुल्लडबाजांवर कडक कारवाईचे आदेश

## नववर्षाच्या पार्श्वभूमीवर मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कडक कारवाईचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले

**पुणे | प्रतिनिधी**

नववर्षाच्या पार्श्वभूमीवर मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कडक कारवाईचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. आगामी महापालिका निवडणूक, कोरेगाव भीमा विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तालयात शुक्रवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत पोलीस आयुक्तांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या.




नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर शहरात कडक बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. मद्यप्राशन करुन भरधाव वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई, तसेच शहरातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शुक्रवारी (२६ डिसेंबर) पोलीस आयुक्तालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या बैठकीत पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. आगामी महापालिका निवडणूक, कोरेगाव भीमा विजयस्तंभ अभिवादन सोळा, तसेच नववर्षाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मद्यप्राशन करुन भरधाव वेगाने वाहनचालकांविरुद्ध करण्यात येणारी कारवाई तीव्र करण्यात यावी. चौकाचौकात नाकाबंदी करुन वाहनचालकांची तपासणी करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

नववर्ष स्वागतासाठी लष्कर, बंडगार्डन, कोरेगाव पार्क, बाणेर, बालेवाडी परिसरात गर्दी होती. या भागात पबची संख्या मोठी आहे. या भागातील पब, रेस्टॉरंटच्या परिसरातील गैरप्रकार होणार नाहीत, याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

### हुल्लडबाजांवर कारवाई

» नववर्ष स्वागतासाठी लष्कर, बंडगार्डन, कोरेगाव पार्क, बाणेर, बालेवाडी परिसरात गर्दी होती. या भागात पबची संख्या मोठी आहे. या भागातील पब, रेस्टॉरंटच्या परिसरातील गैरप्रकार होणार नाहीत, याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. गैरप्रकार रोखण्यासाठी पब, रेस्टॉरंट, हॉटेलच्या परिसरात गस्त घालण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वाहतूक नियम धुडकावणे, मद्यप्राशन करुन भरधाव वाहने चालविणे, तसेच हुल्लडबाजांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# झेडपी निवडणुकीचा मुहूर्त पुन्हा हुकला? प्रशासकीय हालचालींनी वाढवला सस्पेन्स

## 22 जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याने अडकला पेच; निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कमतरतेचाही फटका.

**पुणे | प्रतिनिधी**


सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या म्हणजेच नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका 31 जानेवारीपूर्वी होणे अपेक्षित असतानाही जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांबाबत अद्याप ठोस निर्णय झालेला नाही. प्रशासकीय पातळीवरील हालचाली पाहता या निवडणुका दहावी-बारावीच्या परीक्षा संपल्यानंतर, म्हणजेच एप्रिल-मे महिन्यात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

चालू महिन्यात नगरपरिषदांच्या निवडणुका पार पडल्या असून 15 जानेवारीला महानगरपालिकांच्या निवडणुका होणार आहेत; मात्र त्यानंतरही जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांच्या घोषणेला विलंब होत असल्याचे चित्र आहे. पूर्वी 24 डिसेंबरपर्यंत निवडणूक कार्यक्रम जाहीर होईल, असा अंदाज होता; तोदेखील फोल ठरला आहे.

राज्यातील 34 जिल्हा परिषदांपैकी केवळ 12 जिल्हा परिषदांमध्ये आरक्षण 50 टक्क्यांच्या आत आहे. या ठिकाणी निवडणूक आयोगाची तयारी पूर्ण झाली आहे. मात्र उर्वरित 22 जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याने निर्णय रखडलेला आहे. याशिवाय निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची कमतरता आणि मतदान यंत्रांची उपलब्धता हेही अडथळे ठरत आहेत.

जवळपास चार वर्षे उलटूनही निवडणूक न झाल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये अस्वस्थता आहे. खर्च करायचा की थांबायचे? या संभ्रमात अनेक इच्छुकांनी सध्या शांत राहण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे वाढदिवस, शुभेच्छा, सोशल मीडियावरील हालचाली यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटले आहे. 2017 मध्ये हवेली तालुक्यातून 13 जिल्हा परिषद सदस्य व 26 पंचायत समिती सदस्य निवडून आले होते. आता हे प्रमाण 6 जिल्हा परिषद सदस्य व 12 पंचायत समिती सदस्यांवर आले आहे. त्यामुळे गट-गणांची नव्याने फेररचना करण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या म्हणजेच नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका 31 जानेवारीपूर्वी होणे अपेक्षित असतानाही जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांबाबत अद्याप ठोस निर्णय झालेला नाही.



### इच्छुकांमध्ये संभ्रम, 'वाट पाहू'ची भूमिका

» पुणे जिल्हा परिषद व 13 पंचायत समित्यांची शेवटची निवडणूक फेब्रुवारी 2017 मध्ये झाली होती. पुढील निवडणूक फेब्रुवारी 2022 मध्ये अपेक्षित होती. मात्र जवळपास चार वर्षे उलटूनही निवडणूक न झाल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये अस्वस्थता आहे. खर्च करायचा की थांबायचे? या संभ्रमात अनेक इच्छुकांनी सध्या शांत राहण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे वाढदिवस, शुभेच्छा, सोशल मीडियावरील हालचाली यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटले आहे.

### हवेली तालुक्याची गणिते बदलली

» हवेली तालुक्यातील काही गावांचा पुणे महानगरपालिकेत समावेश झाल्याने तालुक्याची लोकसंख्या कमी झाली आहे. 2017 मध्ये हवेली तालुक्यातून 13 जिल्हा परिषद सदस्य व 26 पंचायत समिती सदस्य निवडून आले होते. आता हे प्रमाण 6 जिल्हा परिषद सदस्य व 12 पंचायत समिती सदस्यांवर आले आहे. त्यामुळे गट-गणांची नव्याने फेररचना करण्यात आली आहे.

### परीक्षा संपल्यानंतरच निवडणुका

» याशिवाय बारावीच्या लेखी परीक्षा 10 फेब्रुवारीपासून, तर दहावीच्या परीक्षा 20 फेब्रुवारीपासून सुरू होत असून 18 मार्चपर्यंत चालणार आहेत. त्यामुळे या परीक्षा संपल्यानंतरच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका घेण्याचा विचार असल्याचे प्रशासनातील हालचालींवरून स्पष्ट होत आहे.

# गौतम अदानींच्या हस्ते होणार देशातील सर्वात मोठ्या 'एआय' केंद्राचं उद्घाटन

## बदलत्या काळाची पावले ओळखून शरद पवारांचा मोठा पुढाकार; ग्रामीण विद्यार्थ्यांच्या हाताला मिळणार प्रगत तंत्रज्ञानाची जोड.

**पुणे | प्रतिनिधी**

देशातील सर्वात अत्याधुनिक व ग्रामीण जीवनाचा चेहरामोहरा बदलू शकणा-या विद्या प्रतिष्ठानच्या शरदचंद्र पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे उद्घाटन रविवारी (दि. २८) रोजी होत आहे. अदानी उद्योगसमूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्या हस्ते, ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे,खासदार सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत सकाळी दहा वाजता गदिमा सभागृहात हे उदघाटन होणार आहे.

विद्या प्रतिष्ठाणचे उपाध्यक्ष अँड. ए. व्ही. प्रभुणे, खजिनदार युगेंद्र पवार, सचिव अँड. नीलिमा गुजर यांनी या बाबत माहिती दिली. बदलत्या काळाची पावले ओळखत आर्टिफिशियल इंटेलिजेन्सचे शिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावे या उद्देशाने शरद पवार यांच्या पुढाकारातून बारामतीत हे केंद्र सुरु होत आहे.

या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये अत्याधुनिक एआय व डेटा सायन्स प्रयोगशाळा, प्रमाणपत्र व कौशल्यवर्धक अभ्यासक्रम, उद्योगतज्ज्ञांचे मार्गदर्शन, संशोधन व नवउद्योजकतेसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. शरदचंद्र पवार सेंटर ऑफ एक्सलन्स (AI) हे केंद्र कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, व्यवसाय विश्लेषण व नवोन्मेष या आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात विद्यार्थ्यांना, संशोधकांना व उद्योगजगताला एकत्र आणणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.



### एआय क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पाऊल

» शरदचंद्र पवार सेंटर ऑफ एक्सलन्स (AI) हे केंद्र कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, व्यवसाय विश्लेषण व नवोन्मेष या आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात विद्यार्थ्यांना, संशोधकांना व उद्योगजगताला एकत्र आणणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.

### केंद्राची उद्दिष्टे

» विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख एआय कौशल्ये विकसित करण्याची संधी.
» संशोधन, नवोन्मेष व स्टार्ट-अप संस्कृतीला चालना.
» उद्योग-संस्था सहकार्याद्वारे प्रत्यक्ष प्रकल्प व प्रशिक्षण.
» ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध करून देणे.